# जनसंपर्क अधिकारी

पोलीस आयुक्त, मीरा-भाईंदर,वसई-विरार यांचे कार्यालय,
रामनगर सृष्टी, मीरारोड पुर्व ता. जि. ठाणे
फोन नं ०२२-२९४५१००१
Mail ID- pro.cp.mb-vv@mahapolice.gov.in


**प्रेसनोट क्रमांक :- २८३** **दिनांक :- ०६/१०/२०२१**

## नवरात्रौत्सवाचे अनुषंगाने पोलीस उपआयुक्तांचे फौजदारी प्रक्रिया संहिता १९७३ चे कलम १४४ (१) (२) अन्वये मनाई आदेश लागू:-

महाराष्ट्र शासनाने सन २०२१ या वर्षी नवरात्रौत्सव साजरा करण्याबाबत परवानगी दिलेली आहे. मात्र कोरोनाची दुसरी लाट सध्या ओसरली असली तरी अजुनही कोरोनाचा धोका कायम आहे. त्यामुळे नागरिकांनी मोठया प्रमाणात एकत्र येउन गर्दी करुन उत्सव साजरा करणे उचित होणार नाही व नवरात्रौत्सव साजरा करतांना सर्व नागरिकांनी आरोग्याच्या दृष्टीकोनातुन योग्य ती खबरदारी घेणे अत्यावश्यक आहे. त्याकरिता श्री. विजयकांत सागर, पोलीस उप आयुक्त (मुख्यालय) मिरा-भाईंदर, वसई-विरार आयुक्तालय यांनी फौजदारी प्रक्रिया संहिता १९७३ चे कलम १४४ (१) (२) अन्वये **मिरा-भाईदर महापालिका** आयुक्तालय कार्यक्षेत्रात दि. ०७/१०/२०२१ ते १५/१०/२०२१ या कालावधी करिता मनाई आदेश जारी करून खालीलप्रमाणे निर्बंध लागू केलेले आहेत.

१) देवीच्या मुर्तीची उंची सार्वजनिक मंडळाकरीता ४ फुट व घरगुती देवीच्या मुर्तीची उंची २ फुटांच्या मर्यादेत असावी.
२) गरबा, दांडिया व इतर सांस्कृतिक कार्यक्रम आयोजित करण्यास मनाई राहिल.
३) मंडपात एकावेळी ५ पेक्षा जास्त व्यक्ती एकत्र जमणार नाहीत.
४) देवीच्या आगमन व विसर्जन मिरवणुका काढण्यात येणार नाहीत.
५) विसर्जनाच्या तारखेस जर घरगुती तसेच सार्वजनिक नवरात्रौत्सव मंडळाचा परिसर प्रतिबंधित क्षेत्रात असेल तर, मुर्ती विसर्जन सार्वजनिक ठिकाणी करण्यास मनाई असेल.

सदरचा मनाई आदेश हा मिरा-भाईंदर महानगरपालिका कार्यक्षेत्राकरिता दिनांक ०७/१०/२०२१ रोजीचे ००.०१ ते दिनांक १५/१०/२०२१ रोजीचे २४.०० वा. पर्यंत लागू असणार आहे.

---ooo---